महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ◆ ६ सप्टेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०७५ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024


## महापालिका निवडणुकांच्या हालचालींना वेग

### निवडणूक आयुक्त थेट पालिकेत, दिवसभर बैठका; नेमकं काय घडलं?

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



मुंबई : राज्याचे निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांच्याकडून आज मुंबई महापालिकेच्या निवडणूकपूर्व तयारीच्या कामांचा आढावा घेण्यात आला आहे. मुंबई महापालिकेच्या मुख्यालयात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीमध्ये त्यांनी निवडणूकपूर्व कामाचा आढावा घेतला. सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने केलेली पूर्वतयारी परिपूर्ण असल्याचे नमूद करत, यावेळी राज्य निवडणूक आयोगाच्या वतीनं समाधान व्यक्त करण्यात आलं आहे.

या बैठकीला मुंबई महापालिकेचे आयुक्त तसेच प्रशासक भूषण गगराणी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी, राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी, कोकण विभागाचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, जिल्हाधिकारी आंचल सूद गोयल, मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्यासह संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते. यावेळी विशेष कार्य अधिकारी (निवडणूक) विजय बालमवार यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे निवड आयुक्तांना निवडणूकपूर्व तयारी कामांची माहिती दिली.

**मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील एकूण मतदार संख्या व मतदान केंद्र, मतदार यादी विभाजन, प्रस्तावित मतदान केंद्रांचे वर्गीकरण, आवश्यक मतदान यंत्रे, मतदान यंत्रे साठवणूक व्यवस्था, निवडणूक साहित्य, मतदान केंद्रावरील सोयी-सुविधा, निवडणुकीसाठी आवश्यक अधिकारी - कर्मचारी वर्ग आदी विविध विषयांचा यावेळी दिनेश वाघमारे यांनी आढावा घेतला.**

मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील एकूण मतदार संख्या व मतदान केंद्र, मतदार यादी विभाजन, प्रस्तावित मतदान केंद्रांचे वर्गीकरण, आवश्यक मतदान यंत्रे, मतदान यंत्रे साठवणूक व्यवस्था, निवडणूक साहित्य, मतदान केंद्रावरील सोयी-सुविधा, निवडणुकीसाठी आवश्यक अधिकारी – कर्मचारी वर्ग आदी विविध विषयांचा यावेळी दिनेश वाघमारे यांनी आढावा घेतला. यावेळी बोलताना राज्य निवडणूक आयुक्तांनी म्हटलं की, बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने निवडणुकीसाठी केलेली पूर्वतयारी परिपूर्ण आहे. मतदान केंद्रांवरील सुविधा वाढवून त्याची प्रभावी जनजागृती करण्यात यावी, जेणेकरून मतदानाची टक्केवारी वाढेल. मागील सार्वत्रिक महानगरपालिका निवडणुकीदरम्यान आलेल्या अडचणींचे निराकरण कशा प्रकारे होईल, याचा विचार करून यंदा अधिक सक्षम उपाययोजना राबवाव्यात. मतदान प्रक्रिया सुरळीत व पारदर्शक पार पाडावी, यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलावीत. सर्वांनी पारदर्शक व निर्भयपणे कामकाज करावे. विविध यंत्रणांमध्ये योग्य समन्वय साधून कामकाज सुरळीत व प्रभावीरितीने पूर्ण होईल, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश यावेळी राज्य निवडणूक आयुक्त वाघमारे यांनी दिले आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आता घडामोडींना वेग आल्याचं पहायला मिळत आहे.

## पंतप्रधानांच्या वाढदिवसानिमित्त
## ७५ हजार युवकांना रोजगाराभिमुख प्रशिक्षणाची संधी

**- मंत्री मंगलप्रभात लोढा**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता




मुंबई : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा १७ सप्टेंबर रोजी ७५ वा वाढदिवस असून हा दिवस अविस्मरणीय व्हावा यासाठी कौशल्य विभाग रोजगार आणि स्वयंरोजगार सेवा पंधरवडा साजरा करत आहे. या अनुषंगाने राज्यातल्या सुमारे ७५ हजार युवक आणि युवतींना कौशल्यविषयक प्रशिक्षण दिले जाणार असल्याची माहिती कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली आहे. येत्या १७ सप्टेंबर पासून २ ऑक्टोबर पर्यंत हा पंधरवडा सुरु राहणार असून १ ऑक्टोबर २०२५ रोजी राज्यातील ४१९ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आयटीआय) अभ्यासक्रमांचा शुभारंभ केला जाणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग युवकांना रोजगार आणि स्वयंरोजगार मिळवून देण्यासाठी स्थानिक उद्योगांच्या मागणीनुसार प्रत्येक जिल्ह्यात विविध उपक्रम राबवत आहेत. तर मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या मार्गदर्शनात राज्यातील आयटीआयमध्ये रोजगाराच्या जागतिक संधी उपलब्ध करून देणारे अत्याधुनिक अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत. केवळ शहरी भागातच नाही तर ग्रामीण भागातही आता अत्याधुनिक अल्पकालीन अभ्यासक्रम सुरु होत आहेत. कौशल्य विकासाद्वारे युवक व युवतींचे सक्षमीकरण हा यामागचा मूळ उद्देश आहे. मात्र अनेकांना नियमित कार्यशाळेत जाऊन वेळेअभावी किंवा इतर कारणास्तव प्रशिक्षण घेण्याची संधी मिळत नाही, अशा होतकरू युवकांना आणि युवतींना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने प्रत्येक जिल्ह्यात अल्पकालीन अभ्यासक्रमाची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. आयटीआयच्या नियमित वर्गाच्या व्यतिरिक्त इतर उपलब्ध वेळेत हे अभ्यासक्रम घेण्यात येतील.

राज्यातील आयटीआयमध्ये सध्या प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसोबतच अतिशय अल्पदरात युवक आणि युवतींना रोबोटिक, सौर ऊर्जा तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय, व्यक्तिमत्व आणि सामाजिक विकासासंदर्भात अत्याधुनिक अभ्यासक्रम चालवले जाणार आहेत. स्थानिक उद्योग आस्थापनांमध्ये रोजगारासाठी आवश्यक असलेले ज्ञान आणि प्रशिक्षण त्याच जिल्ह्यात मिळाल्याने तरुणांना आपला जिल्हा सोडून अन्य ठिकाणी रोजगारासाठी जावे लागणार नाही. उद्योगांना पूरक स्वयंरोजगाराच्या संधी या अल्पकालीन अभ्याक्रमाच्या माध्यमाने तरुणांना उपलब्ध होणार आहेत. विशेष म्हणजे सध्या आयटीआयचे प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थींकडून या अभ्यासक्रमांसाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारले जाणार नाही. https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करून विद्यार्थ्यांना विविध अभ्यासक्रमास प्रवेश देण्यात येणार आहे. या संकेतस्थळावर राज्यातल्या प्रत्येक जिल्ह्यात सुरु होत असलेल्या अभ्यासक्रमांची सविस्तर माहिती तसेच प्रवेश प्रक्रियेची माहिती देण्यात आली आहे. अल्पकालीन अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर युवकांना रोजगाराच्या संधीबाबत आणि स्वयंरोजगाराची माहितीही संबंधित आयटीआय संस्थेत दिली जाणार आहे. उपलब्ध जागांचा विचार करता प्रथम येणाऱ्यास प्राधान्य दिले जाणार असून युवक आणि युवतींनी त्वरित या अभ्यासक्रमांसाठी नोंदणी करावी, असे आवाहनही मंत्री श्री. लोढा यांनी केले आहे.

## त्रिभाषा धोरण निश्चितीसाठी समिती सदस्यांची नियुक्ती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



मुंबई : राज्यात हिंदी सक्तीच्या मुद्द्यावरून काही दिवसांपूर्वी चांगलंच वातावरण तापलं होतं. राज्यातील अनेक पक्षांनी आणि संघटनांनी त्रिभाषा सूत्राच्या विरोधात भूमिका घेतली होती. त्रिभाषा सूत्राच्या विरोधात मनसेनं मोठं आंदोलन उभारल्याचं पहायला मिळालं, त्यानंतर या आंदोलनात शिवसेना ठाकरे गटानं देखील उडी घेतली. विरोध वाढल्यानं अखेर सरकारने त्रिभाषा सूत्राबाबतचे दोन्ही जीआर रद्द करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर त्रिभाषा धोरण निश्चितीसाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली आहे. दरम्यान डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली त्रिभाषा धोरण निश्चितीसाठी गठीत करण्यात आलेल्या समितीमध्ये आता सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या समितीमध्ये एकूण सात सदस्यांची नियुक्ती करण्यात आली होती. यामध्ये डॉ. सदानंद मोरे, माजी अध्यक्ष, भाषा सल्लागार समिती, डॉ. वामन केंद्रे , संचालक, नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा, डॉ. अपर्णा मॉदरस, शिक्षणतज्ज्ञ, पुणे, सोनाली कुलकर्णी, जोशी, भाषा विज्ञान प्रमुख, डेक्कन कॉलेज, पुणे, डॉ. मधुश्री सावजी, शिक्षणतज्ज्ञ, छत्रपती संभाजीनगर, डॉ. भूषण शुक्ल , बालमानसतज्ज्ञ आणि संजय यादव यांचा समावेश आहे.

### त्रिभाषा सूत्राला विरोध

दरम्यान राज्यात मनसेकडून त्रिभाषा सूत्राला विरोध करण्यात आला होता, मनसेच्या कार्यकर्त्यांनी याविरोधात मोठं आंदोलन उभारलं, त्यानंतर शिवसेना ठाकरे गटानं देखील या आंदोलनात उडी घेतली. त्यामुळे राज्यात वातावरण चांगलंच तापलं, अखेर वाढत असलेला विरोध पाहून सरकारनं हा अध्यादेश मागे घेण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर सरकारने त्रिभाषा सूत्रासंदर्भातील दोन्ही जीआर रद्द केले. त्यानंतर डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली त्रिभाषा सूत्राचे धोरण निश्चित करण्यासाठी समितीची नियुक्ती करण्यात आली आहे. या समितीमधील सदस्यांची नियुक्ती आज करण्यात आली आहे. या समितीमध्ये एकूण सात जणांचा समावेश असणार आहे. हे सर्व सदस्य शिक्षण, भाषा आणि इतर क्षेत्रातील तज्ज्ञ आहेत. सरकारने जीआर रद्द केल्यानंतर वरळीमध्ये विजयी मेळावा पार पडला होता, या मेळाव्यात पहिल्यांदाच मनसे प्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे तब्बल वीस वर्षांनंतर एकत्र आल्याचं पहाला मिळालं.

## कल्याण तालुक्यातील आठ शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार

### शिक्षकदिनीच मानिवली शाळा ठरली मुख्यमंत्री, माझी शाळा सुंदर शाळा,!





दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : शिक्षकदिनाच्या औचित्याने शिक्षण विभाग पंचायत समिती कल्याण,च्या वतीने आयोजित “तालुका आदर्श शिक्षक गुणगौरव पुरस्कार २०२५-२६” वितरण सोहळा आज ५सप्टेंबर या शिक्षकदिनीच गोवेली येथील जीवनदिप महाविद्यालयात आमदार किसन कथोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला, यावेळी तालुक्यातील८शिक्षकांचा गौरव करण्यात आला तर जिल्हा परिषद शाळा मानिवली ने 'मुख्यमंत्री, माझी शाळा सुंदर शाळा, स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला, त्यामुळे या सर्वाचे कौतुक करण्यात आले.

आमदार किसन कथोरे यांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली.यानंतर शालेय विद्यार्थ्यांनी स्वागत गीत गाऊन पाहुण्याचे स्वागत केले. यावेळी प्रथम जिल्हा स्तरावरील आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त राजाराम वेंखडे(जिप शाळा, कांबा)यांचा सन्मानचिन्हे, प्रमाणपत्र शाल, श्रीफळ, तुळशीचे रोपटे देऊन आमदार कथोरे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यानंतर श्रीमती वर्षा कदम, रेखा चौधरी, आशा धिंगे,शमशाद जुवारी, वासुदेव ठाकूर, सुखदेव कांबळे, सुनिल देसले, इत्यादी शिक्षकांचा आमदार कथोरे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

तर मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत जिप शाळा मानिवली केंद्र गोवेली यांनी प्रथम क्रमांक पटकावला, तसेच जिप शाळा पिंपरी, केंद्र दहिसर, द्वितीय, आणि तृतीय क्रमांक जिप शाळा हेदूटणे केंद्र खोणी यांचा आला.

या शाळांच्या सर्व शिक्षक, पालक, ग्रामस्थ यांचा आमदार कथोरे, गटविकास अधिकारी संजय भोये, गटशिक्षणाधिकारी, कुंदा पंडित मॅडम, उपशिक्षणाधिकारी स्वप्नील पोळ, आणि योजना प्रमुख श्रीम. विद्या नाईकवाडी मॅडम ,भाजपाचे शेखर लोणे,यांनी सत्कार केला.यावेळी बोलताना आमदार किसन कथोरे यांनी हा पुरस्कार सोहळा आजच्याच दिवशी आयोजित केल्याने समाधान व्यक्त केले, तसेच आदर्श शिक्षक पुरस्काराप्रमाणे कल्याण पंचायत समिती देखील आदर्श असल्याचे त्यांनी सांगितले. तर गटविकास अधिकारी संजय भोये यांनी शिक्षकांचे अभिनंदन करून जबाबदारीची देखील जाणीव करून दिली. जीवनदीप महाविद्यालयाचे अध्यक्ष व सभापती रविंद्र घोंडविंदे सर यांनी ही मार्गदर्शन केले, पुरस्कार मिळालेल्या शिक्षकांपैकी काही शिक्षकांनी प्रातिनिधीक स्वरूपात आपले विचार मांडले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटशिक्षणाधिकारी श्रीम, कुंदा पंडित यांनी केले तर आभार योजना प्रमुख श्रीम. विद्या नाईकवाडी यांनी मानले,यावेळी परिसरातील सरपंच, ग्रामस्थ, शिक्षक, त्यांचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.






## केडीएमसी प्रभाग रचना हरकतींवर गुरुवारी सुनावणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : कल्याण डोंबिवली पालिकेच्या आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पालिकेने १२२ प्रभागांची प्रारूप भौगोलिक सीमा रचना जाहीर केली आहे. या प्रभाग रचनेवर कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील २६४ नागरिकांनी हरकती आणि सूचना पालिकेकडे दाखल केल्या आहेत, अशी माहिती पलिका निवडणूक विभागाचे उपायुक्त रमेश मिसाळ यांनी दिली.

पालिकेची १२२ प्रभागांची प्रारूप यादी प्रसिध्द होताच नागरिकांना २२ ऑगस्ट ते ४ सप्टेंबरपर्यंत हरकती आणि सूचना घेण्यासाठी अवधी देण्यात आला होता. या कालावधीत नागरिकांनी २६४ हरकती आणि सूचना दाखल केल्या आहेत.

नागरिकांनी दाखल केलेल्या हरकती आणि सूचनांवर राज्य शासनाकडून प्राधिकृत केलेले उद्योग संचलनालयाचे विकास आयुक्त दीपेंद्र कुशवाह ११ सप्टेंबर रोजी कल्याण डोंबिवली पालिकेच्या स्थायी समिती सभागृहात नागरिकांच्या हरकती आणि सूचनांवर सुनावणी घेणार आहेत. ही सुनावणी सकाळी दहा ते संध्याकाळी पाच या वेळेत सुरू राहणार आहे.

कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील २७ गावांमधील नागरिकांनीही या प्रभाग रचनेवर तीव्र आक्षेप घेतले आहेत. ही प्रभाग रचना आम्हाला मान्य नाही आणि आम्हाला कल्याण डोंबिवली पालिकेत राहायचे नाही, अशी भूमिका घेत आम्ही चार हजार हरकती दाखल केल्या आहेत, असे सर्व पक्षीय ग्रामीण संघर्ष समितीचे सत्यवान म्हात्रे यांनी सांगितले.कल्याण डोंबिवली पालिकेच्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (आठवले गट) डोंबिवली विभागाचे अध्यक्ष किशोर मगरे यांनीही या प्रारूप प्रभाग रचनेला हरकत घेतली आहे. कल्याण डोंबिवली शहराची लोकसंख्या वाढली आहे. २०११ च्या जणगणनेप्रमाणे ही प्रभाग रचना केल्यास पालिका हद्दीतील अनुसूचित जाती, जमातीच्या नागरिक, उमेदवारांना यामध्ये न्याय मिळणार नाही. त्यामुळे सन २०२५ च्या लोकसंख्येचा विचार करून नवीन प्रभाग रचना जाहीर करावी. अन्यथा रिपाई आठवले गट या प्रभाग रचनेला न्यायालयात आव्हान दिल्या शिवाय राहणार नाही, असा इशारा अध्यक्ष किशोर मगरे यांनी दिला आहे.




# अनंत चतुर्दशीच्या गणपती विसर्जनासाठी केडीएमसी सज्ज

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

अनंत चतुर्दशीच्या दिवशी होणाऱ्या श्री गणेश विसर्जनासाठी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने जय्यत तयारी केली आहे. महापालिकेच्या विद्युत विभागामार्फत एकुण 76 विसर्जन स्थळी जनरेटरची व्यवस्था करण्यात आली असून, 2475 हॅलोजन, 558 एलईडी, 105 लाईटनिंग टॉवर तसेच 38 प्रमुख लोकेशन्सवर 212 सीसीटीव्हीची कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

कल्याण परिसरातील नागरीकांना श्री गणेश मूर्ती विसर्जनासाठी एकुण 65 ठिकाणी महापालिकेमार्फत व्यवस्था करण्यात आली असून, यामध्ये अ, ब, क, ड व जे प्रभागात "विसर्जन आपल्या दारी" ही संकल्पना राबविण्यात येत आहे.

तर डोंबिवली परिसरातील नागरीकांना श्री गणेश मूर्ती विसर्जनासाठी एकुण 62 ठिकाणी महापालिकेमार्फत व्यवस्था करण्यात आली असून, यामध्ये फ, ग, ह, आय व ई प्रभागात "विसर्जन आपल्या दारी" ही संकल्पना राबविण्यात येत आहे.

महापालिकेने सर्व प्रभागातील विसर्जन स्थळांवर कृत्रिम विसर्जनासाठी चोख व्यवस्था ठेवली आहे. त्याचप्रमाणे महापालिकेच्या वैदयकिय आरोग्य विभागामार्फत सर्व प्रभागक्षेत्रनिहाय वैदयकीय पथकाची (डॉक्टर्स,स्टाफनर्स इ.) तसेच प्रमुख विसर्जन स्थळावर रुग्णवाहिकेची सुविधा देखील उपलब्ध करुन देण्यात आली. अग्निशमन विभागामार्फत प्रमुख विसर्जन स्थळांवर बोट, तराफा, लाईफबॉय, लाईफजॅकेट, गोताखोर या सुविधा देण्यात आल्या आहेत.

शासनाच्या निर्देशानुसार 6 फुटा पेक्षा कमी उंचीच्या सर्व मूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावात करणे आवश्यक आहे. यामुळे पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होणार आहे.

सर्व विसर्जन स्थळी विसर्जन प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी आयुक्त अभिनव गोयल यांच्या निर्देशानुसार दुर्गाडी, मोठा गाव, कुंभारखान पाडा इ. महत्त्वांच्या विसर्जन स्थळांवर सर्व श्री गणेश मुर्तीचे विसर्जन होईपर्यंत अधिकारी वर्गाच्या नेमणूका करण्यात आल्या आहेत. विसर्जन स्थळांवर घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत निर्माल्य कलश, डस्टबिन, साफसफाईसाठी मनुष्यबळ देण्यात आले आहे.

# ठाणे जिल्ह्यात महाभयंकर पाऊस हवामान विभागाकडून रेड अलर्ट

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : महाराष्ट्रात पुन्हा एकदा पावसाचं रौद्ररुप बघायला मिळत आहे. ठाणे जिल्ह्यात तर पावसाचा प्रचंड उद्रेक बघायला मिळतोय. ठाणे जिल्ह्यातील कल्याण, डोंबिवली, भिवंडी, अंबरनाथ, बदलापूर, टिटवाळा या शहरांमध्ये तर पाऊस अक्षरशः वैरी बनून कोसळतोय की काय इतका पाऊस पडत आहे. पावसाचं हे रौद्र रुप हे असंच पुढचे काही तास सुरु राहणार असल्याची माहिती आहे. हवामान विभागाकडून ठाणे आणि पालघर या दोन जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. या दोन जिल्ह्यांना पुढच्या तीन तासांसाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांनी काळजी घ्यावे, असं आवाहन केलं जात आहे.

# श्रीमद भागवत कथा आणि भागवत सप्ताह



हिंदूंच्या अठरा महापुराणांपैकी सर्वाधिक लोकप्रिय असे महापुराण. ते संस्कृतात आहे. हे नुसते भागवत वा श्रीमद्‌भागवत या नावाने प्रसिद्ध आहे. भागवत पुराण, श्रीमद्भागवतम् किंवा श्रीमद् भागवत महापुराण असेही म्हणतात. श्रीमद् भागवत पुराणाचे लेखक महर्षि वेदव्यास मानले जातात; याची रचना बारा स्कंधांत करण्यात आली असून त्यात ३३२ अध्याय व सुमारे १८ हजार श्लोक आहेत. श्रीमद् भागवत पुराणाचा दहावा खंड सर्वांत मोठा, तर बारावा सर्वांत लहान आहे. दहाव्या स्कंधाची पूर्वार्ध व उत्तरार्ध अशा दोन भागांत विभागणी करण्यात आली आहे. विष्णुचा अवतार कृष्ण हा भागवताचा नायक असून त्याच्या भक्तीचे गुणगान त्यात केलेले आहे म्हणून हे एक वैष्णव पुराण मानले जाते. श्रीमद् भागवत हे संसारातले भय आणि दुःख यांचा समूळ नाश करणारे अमृत मानले जाते आणि ते मोक्ष प्रदान करणारे आहे. श्रीमद् भागवत हा एक पवित्र ग्रंथ असून, त्याची कथा आणि निरूपणे देशभरात, विशेषतः भाद्रपद महिन्यात आयोजित केले जातात.

भारतीय संस्कृती आणि परंपरा यांमध्ये श्रीमद् भागवत कथा आणि भागवत सप्ताह याला अनन्य साधारण महत्त्व आहे. यंदा २०२५ मध्ये सोमवार, ०१ सप्टेंबर २०२५ रोजी श्रीमद् भागवत कथा आणि भागवत सप्ताह प्रारंभ झालेला असून, रविवार, ०७ सप्टेंबर २०२५ रोजी श्रीमद् भागवत कथा आणि भागवत सप्ताह समाप्ती होणार आहे. श्रीमद् भागवत ग्रंथात केवळ कथा नाहीत, तर भगवंताच्या प्रत्येक कथांमधून प्रत्येक जीवाचा उद्धार कसा करावा, हेच सांगितले आहे. श्रीमद् भागवत ग्रंथातून अत्यंत सरळ आणि सोप्या भाषेत मानवजातीला अचूक मार्ग दाखविला आहे. श्रीमद् भागवत ग्रंथाकडे केवळ कथा म्हणून न पाहता, या कथांचे आपल्या जीवनात काय महत्त्व आहे आणि आपण त्यातील काय आत्मसात करायचे हे आपल्याला समजायला हवे. भागवत ग्रंथ म्हणजे ज्ञानयज्ञ सोहळा आहे. त्यामुळे त्यातील तत्त्वज्ञान समजून घ्यायला हवे. आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये हजारो वर्षांपासून वैदिक परंपरा आहे. या परंपरेमध्ये संपूर्ण समाज आणि समाजातील प्रत्येक व्यक्ती कोणत्याही जात, पंथ धर्माचा असला तरी प्रत्येक जीवाचे उत्थान व्हावे आणि हयात असेपर्यंत जीवनात परमोच्च अत्यानंदाची अनुभूति घेता यावी, यासाठी मार्गदर्शन केले आहे.

भागवतधर्म व भक्तिसंप्रदाय यांच्या दृष्टीने प्रमाणग्रंथच महापुराणात दिलेल्या परंपरेनुसार ते वासुदेवाने ब्रह्मदेवाला, ब्रह्मदेवाने नारदाला, नारदाने व्यासांना, व्यासांनी शुकदेवाला आणि शुकदेवाने परीक्षित राजाला सांगितले. इतर कोणत्याही पुराणापेक्षा श्रीमद् भागवतावर अधिक टीका झाल्या, हे भागवताच्या लोकप्रियतेचे एक गमकच होय. श्रीमद् भागवत ग्रंथाचा अर्थ लावणे ही विद्यावंतांच्या विद्येची कसोटी आहे, अशी म्हण रूढ झाली आहे. यावरून भागवतातील आशयाचे गांभीर्य व टीकांची आवश्यकताही स्पष्ट होते. भारताच्या सांस्कृतिक जीवनावर भागवताचा फार मोठा प्रभाव पडला आहे. भागवतधर्म व भक्तिसंप्रदाय यांच्या दृष्टीने भागवत हा एक प्रमाणग्रंथच आहे. काव्याच्या दृष्टीनेही त्यातील वर्णने भावपूर्ण व रसात्मक आहेत. प्रचंड वाङ्मय लिहूनही मनःशांती न लाभलेल्या व्यासांना भागवताच्या लेखनामुळे मनःशांती लाभली, असे म्हटले जाते. भागवत ही व्यासांची समाधिभाषा आहे; भागवत हे वेदान्ताचे सार आहे; भागवत ही विद्येची परमावधी वा अंतिम मर्यादा आहे; शब्दप्रधान वेद, अर्थप्रधान पुराण व रसप्रधान काव्य या सर्वांचे प्रतिनिधित्व करण्याची क्षमता भागवतात आहे, यांसारख्या विधानांवरून

**भागवतधर्म व भक्तिसंप्रदाय यांच्या दृष्टीने भागवत हा एक प्रमाणग्रंथच आहे. काव्याच्या दृष्टीनेही त्यातील वर्णने भावपूर्ण व रसात्मक आहेत. प्रचंड वाङ्मय लिहूनही मनःशांती न लाभलेल्या व्यासांना भागवताच्या लेखनामुळे मनःशांती लाभली, असे म्हटले जाते. भागवत ही व्यासांची समाधिभाषा आहे; भागवत हे वेदान्ताचे सार आहे; भागवत ही विद्येची परमावधी वा अंतिम मर्यादा आहे.**

माहात्म्य स्पष्ट होते. भागवताच्या पुस्तकाची षोडशोपचार पूजा करण्याची व भागवताची आरती म्हणण्याची पद्धत, भागवताचे सप्ताह-पारायण करण्याची भारतभर रूढ असलेली प्रथा इत्यादींवरूनही भागवताचे जनमानसातील महत्त्वपूर्ण स्थान ध्यानात येते. भागवत सप्ताह साजरा करण्याची परंपरा कधी सुरू झाली? याबाबत पुराणातील एक कथा प्रचलित असल्याचे सांगितले जाते.

राजाचा सर्पदंशाने मृत्यू होण्याचा शाप पौराणिक कथेनुसार, शमीक ऋषी यांच्या आश्रमात पुत्र श्रृंगी यांच्यासह अन्य ऋषिपुत्र अभ्यास करत होते. एक दिवस सर्व विद्यार्थी जंगलात फेरफटका मारण्यासाठी गेले. तेव्हा आश्रमात शमीक ऋषी एकटेच समाधी लावून बसले होते. तहानेने अत्यंत व्याकूळ राजा परिक्षित शमीक ऋषींच्या आश्रमात पोहोचले. आश्रमात पाण्याचा शोध घेऊ ला  गले. ध्यानस्थ असलेल्या शमीक ऋषींना विनम्रपणे नमस्कार करून पाणी देण्याची विनंती केली. दोन-तीन वेळा विनवणी करूनही ऋषींनी डोळे न उघडल्याने समाधीचे ऋषी ढोंग करताहेत, असा समज राजाचा झाला. राजा अत्यंत क्रोधीत झाला. जवळच पडलेल्या एका मृत सापाला ऋषींच्या गळ्यात टाकले आणि तेथून निघून गेले. राजा परिक्षित आश्रमातून जात असल्याचे एका ऋषिकुमाराने पाहिले. ही बाब श्रृंगीला सांगितली. राजाचे स्वागत करण्यासाठी सर्वजण आश्रमात पोहोचले. शमीक ऋषींच्या गळ्यात साप पाहून श्रृंगी अत्यंत क्रोधीत झाला. वडिलांच्या गळ्यात मृत साप टाकणाऱ्या राजा परिक्षितांचा पुढील सातव्या दिवशी नागराज तक्षकच्या दंशाने मृत्यू होईल, असा शाप श्रृंगीने दिला. ऋषिकुमारांनी शमीक यांच्या गळ्यातील साप काढून टाकला. तेवढ्यात शमीक ध्यानातून बाहेर आले. काय घडले आहे, असे विचारल्यावर श्रृंगीने सर्व हकीकत वडिलांना कथन केली.

भगवंताला शरण जाऊन झालेल्या चुकीबद्दल क्षमायाचना करावी राजा परिक्षित यांनी मोठी चूक केलेली नाही. त्यांना सर्पदंशाचा शाप देणे योग्य नाही. असे वागणे आपल्याला शोभत नाही. अजून सर्व ज्ञान तुम्हाला प्राप्त झालेले नाही. भगवंताला शरण जाऊन झालेल्या चुकीबद्दल क्षमायाचना करावी, अशी समज वडिलांनी श्रृंगीला दिली. दुसरीकडे, राजभवनात पोहोचल्यावर राजाला आपली चूक समजली. थोड्याच वेळात शमीक ऋषींचे शिष्य राजा परिक्षितांकडे पोहोचले. राजन, शमीक ऋषी ब्रह्मसमाधीमध्ये लीन असल्याने आपले आदरातिथ्य करता आले नाही. याबाबत त्यांना खेद वाटतो आहे. मात्र, कोणताही विचार न करता आपण त्यांच्या गळ्यात मृत साप टाकल्याने श्रृंगी क्रोधीत झाले आणि पुढील सात दिवसात सर्पदंशाने आपला मृत्यू होईल, असा शाप दिला आहे. श्रृंगींचा शाप असत्य ठरणार नाही, असे सांगितले.

...अन् भागवत सप्ताहाची सुरुवात झाली आपल्या चुकीची योग्य प्रकारे शिक्षा मिळत आहे, याबद्दल राजा परिक्षित यांना समाधान वाटले. सात दिवस ईश्वर-चिंतन आणि मोक्षमार्ग साधनेत घालवावेत, असा सल्ला राजाला देण्यात आला. राजा परिक्षित व्यासपुत्र शुकदेव यांच्याकडे गेले. शुकदेव यांनी राजा परिक्षित यांना सात दिवस सलग भागवत कथा ऐकवली. तेव्हापासून भागवत सप्ताहाची सुरुवात झाली, असे सांगितले जाते.

॥ एकश्लोकी भागवतम् ॥ आदौ देवकिदेविगर्भजननं गोपीगृहे वर्धनम् मायापूतनजीवितापहरणं गोवर्धनोद्धारणम् । कंसच्छेदनकौरवादिहननं कुंतीसुतां पालनम् एतद्भागवतं पुराणकथितं श्रीकृष्णलीलामृतम् । इति श्रीभागवतसूत्र ॥ ॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥

•••

# उत्कृष्ट ग्रंथालये आणि ग्रंथालय सेवकांना राज्य सरकारकडून पुरस्कार

## ३० सप्टेंबर पर्यंत अर्ज सादर करावे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत ग्रंथालय संचालनालयाच्यावतीने राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये, ग्रंथालय कार्यकर्ते व सेवक (ग्रंथमित्र) प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने "डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार" आणि "डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ते व सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार" देण्यात येतात. सन 2024-2025करिता या पुरस्कारांसाठी अर्ज मागविण्यात आले असून, दि. 30 सप्टेंबर 2025 पर्यंत विहित नमुन्यातील अर्ज मागविण्यात आले असल्याची माहिती ग्रंथालय संचालनालयाचे प्र.ग्रंथालय संचालक, मुंबई यांनी कळविले आहे.

या उपक्रमाचा उद्देश म्हणजे राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांचा गुणात्मक विकास व्हावा, ग्रंथालयाकडून जनतेला अधिका चांगल्या ग्रंथालयीन सेवा उपलब्ध व्हाव्या, वाचन संस्कृती सृध्दींगत करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे तसेच ग्रंथालय सेवेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांचा सन्मान करणे हा आहे.

### पुरस्कारांचे प्रकार व बक्षिसे

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार

राज्यातील शहरी व ग्रामीण भागातील "अ", "ब", "क" आणि "ड" या वर्गातील उत्कृष्ट शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना अनुक्रमे रु. 1 लाख, रु. 75 हजार, रु. 50 हजार, रु. 25 हजार इतकी रोख रक्कम, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि ग्रंथभेट देऊन गौरविण्यात येणार आहे.

### डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ते व सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार

राज्यातील एक राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व एक राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथालय सेवक यांना प्रत्येकी रु. 50 हजार तसेच राज्यातील प्रत्येक महसूली विभागातील प्रत्येकी एक उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व उत्कृष्ट ग्रंथालय सेवक यांना प्रत्येकी रु. 25 हजार इतकी रोख रक्कम, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व ग्रंथभेट देऊन गौरविण्यात येणार आहे.

सन 2024-2025या वर्षाच्या पुरस्कारासाठी इच्छुक ग्रंथालये, कार्यकर्ते व सेवक(ग्रंथमित्र) यांनी आपले विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह तीन प्रतीत दि. 30 सप्टेंबर 2025 पर्यंत आपल्या जिल्ह्यातील जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे.

शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये तसेच ग्रंथालय कार्यकर्ते आणि ग्रंथालय सेवक (ग्रंथमित्र) या सर्वांनी या पुरस्कारासाठी अर्ज करावा, असे आवाहन ग्रंथालय संचालनालयाचे प्र. ग्रंथालय संचालक, मुंबई अशोक गाडेकर यांनी एका प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

# रायगड जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागामार्फत देण्यात येणारे जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. २०२५/२६ या शैक्षणिक वर्षासाठी जिल्हाभरातील १७ शिक्षकांची निवड आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी करण्यात आली असल्याची माहिती, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व प्राथमिक शिक्षण अधिकारी ललिता दहितुले यांनी दिली आहे.

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांचा ५ सप्टेंबर हा जन्म दिवस दरवर्षी शिक्षक दीन म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांना त्यांच्या चांगल्या कामगिरीसाठी आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. जिल्ह्यातील १७ शिक्षकांची निवड आदर्श शिक्षक



पुरस्कारासाठी करण्यात आली आहे. पेण तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोनखार येथील मुख्याध्यापक

## पेणमधून किशोर पाटील यांना पुरस्कार

किशोर लक्ष्मण पाटील यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली असून अलिबाग - मनोहर पाटील, पनवेल - योगिनी वैदू, कर्जत संज्योती कांबरी, खालापूर किर्ती धारणे, उरण अजित जोशी, सुधागड वृषाली गुरव, रोहा प्रसाद साळवी, महाड वसंत साळुंखे, श्रीवर्धन सीमा चव्हाण व नारायण खोपटकर, म्हसळा शशीकांत भिंगारदेवे, पोलादपूर विजय पवार, माणगाव सुजाता मालोरे व परेश अंधेरे, तळा उल्का मोडकर, मुरुड हेमकांत गोयजी यांना जिल्हा आदर्श पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. सर्व पुरस्कार विजेत्यांचे जिल्हा आणि तालुका स्तरावर अभिनंदन होत आहे.

# कोकण मराठी साहित्य परिषदेची ३२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कोकण मराठी साहित्य परिषदेची ३२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २०/९/२०२५ रोजी सकाळी ११:४५ वाजता कुडाळ येथे मराठा समाज हॉल , कुडाळ हायस्कूल शेजारी , जिल्हा सिंधुदुर्ग येथे आयोजित करण्यात आली आहे .

या सभेत मागील वर्षीच्या जमा खर्चाचा तपशील सादर करुन मंजुरी घेणे , सन २०२५ ते २०२६ सालाचे आर्थिक नियोजनास मान्यता घेणे , कार्यकारिणीने सुचविलेल्या घटना दुरुस्तीस मान्यता देणे , सन २०२५/२०२६ साठी सनदी लेखापाल नेमण्यास अनुमती घेणे , सन २०२५ ते २०२८ करीता निवडून आलेल्या कार्यकारिणी कडून सन २०२५/२०२८ पर्यंत निवड केलेल्या अध्यक्ष यांना सभेची मंजुरी घेणे , मुख्य समितींच्या निवड प्रक्रिया करून मंजुरी घेणे , कोमसाप सभासद, पदाधिकारी यांच्या सुचना , ठराव अध्यक्षांच्या परवानगीने मंजुरीसाठी ठेवणे , आयत्या वेळी येणारे विषय अध्यक्षांच्या परवानगीने पटलावर ठेवणे ,

सदर सभा परिषदेच्या केन्द्रीय अध्यक्षा सौ नमिता कीर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार असून सर्व सभासदांनी उपस्थित राहून सहकार्य करावे करावे असे आवाहन करण्यात आले आहे .











## आजचे राशि भविष्य

**मेष**

व्यवसायातील तोट्याचे नफ्यात रूपांतर करण्यात यशस्वी व्हाल त्यामुळे तुमचा दिवस चांगला जाईल. प्रगती पाहून तुमचे शत्रू तुमचा हेवा करतील.

**वृषभ**

प्रेम जीवनात असणाऱ्या लोकांना आपल्या जोडीदाराची त्यांच्या कुटुंबातील सदस्यांशी ओळख करून देण्यासाठी आजचा दिवस चांगला असेल.

**मिथुन**

व्यवसायातील एखादा करार जर आज तुम्ही फायनल केला तर त्याचे भविष्यात खूप फायदे होतील.धार्मिक कार्यक्रमात सहभागी झाल्याने तुमचा आदर वाढेल.

**कर्क**

कुटुंबातील सदस्य या प्रस्तावाला त्वरित मान्यता देऊ शकतात. मुलाला जर परदेशात शिक्षण घ्यायचे असेल तर त्याच्यासाठीही आजचा दिवस चांगला असेल.

**सिंह**

मित्रांच्या रूपातील शत्रुंना ओळखावे लागेल. नोकरीत मैत्रिणीच्या मदतीने तुम्हाला प्रमोशन मिळू शकते. एखाद्या शुभ कार्यात सहभागी होऊ शकता.

**कन्या**

कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून विश्वासघात होऊ शकतो त्यामुळे तुम्ही अस्वस्थ व्हाल. संध्याकाळी एखाद्या नातेवाईकाच्या घरी जाण्याचा प्लॅन करू शकता.

**तूळ**

कुटुंबातील मुलांसोबत मजा करण्यात आजची संध्याकाळ घालवाल.दिवस सकारात्मक परिणाम देणारा असल्याने तुमची सर्व कामे पूर्ण होतील .

**वृश्चिक**

पैसे गुंतवण्यापूर्वी विचार करावा लागेल.संध्याकाळी आईच्या तब्येतीबाबत थोडे जागरुक राहावे लागेल. समस्या असल्यास त्या समस्या वाढू शकतात.

**धनु**

नवीन वाहन घेण्याचा विचार करत असाल तर थोडे थांबा.आई-वडिलांच्या आशीर्वादाने कोणतेही काम केल्यास त्यात यश नक्कीच मिळते.

**मकर**

एखाद्या मित्राच्या तब्येतीबद्दल थोडे चिंतेत असाल. त्याच्यासाठी तुम्ही पैशांची व्यवस्था करण्यात धावपळ कराल. खर्च वाढल्याने तुम्ही त्रस्त व्हाल.

**कुंभ**

तुम्ही आनंदी असाल. भावंडांसोबतचे वाद विवाद सुटल्याने देखील आज तुम्ही खुश असाल. विवाहायोग्य लोकांसाठी आज विवाह प्रस्ताव येतील .

**मीन**

एखाद्या ठिकाणी अडकलेले पैसे मिळाल्याने तुमची आर्थिक स्थिती मजबूत होईल. मुलाची प्रगती पाहून तुम्हाला आनंद होईल. आवडीची एखादी गोष्ट मिळेल.

नियमित वाचा दैं. ठाणे जीवनदीप वार्ता

# ठाणे मनपा क्षेत्रात पाळीव प्राण्यांच्या तीन स्मशानभूमी

## महिनाभरात कार्यान्वित करण्याचे महापालिका आयुक्त सौरभ राव यांचे निर्देश

### कोपरी, कळवा आणि माजिवडा येथे होणार स्मशानभूमी पाळीव प्राण्यांसाठी फिरता दवाखाना आणि रूग्णवाहिकाही सुरू होणार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे महापालिका क्षेत्रात पाळीव प्राण्यांसाठी स्मशानभूमी तयार करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार, कोपरी, कळवा आणि माजिवडा येथे पुढील महिनाभरात पाळीव व छोट्या प्राण्यांसाठीच्या स्मशानभूमी कार्यान्वित करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत.

त्याचबरोबर, महापालिका क्षेत्रातील पाळीव व छोट्या प्राण्यांसाठी फिरता दवाखाना आणि रुग्णवाहिकाही उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्याचीही प्रक्रिया जलद करण्याचे निर्देश आयुक्त राव यांनी दिले आहेत.

पाळीव प्राण्यांची स्मशानभूमी आणि रुग्णवाहिकेची उपलब्धता यांचा आढावा घेण्यासाठी शुक्रवारी महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या दालनात बैठक झाली. त्या बैठकीस, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी आणि पशूवैदयकीय अधिकारी डॉ. क्षमा शिरोडकर उपस्थित होत्या.

महापालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कोपरी, कळवा-मनिषानगर आणि माजिवडा येथे मृत पाळीव प्राण्यांचे शास्त्रशुद्ध पद्धतीने दहन करण्यासाठी स्वतंत्र स्मशानभूमी उभारण्याचे काम सुरू आहे. यातील दाहिन्या सीएनजीवर आधारित आहेत. या दाहिन्यांची चाचणी केल्यावर त्या कार्यान्वित होणार आहेत. या सर्व स्मशानभूमींचे बांधकाम, यंत्रणा आदी कामे तत्काळ पूर्ण करून कोणत्याही परिस्थितीत तिन्ही स्मशानभूमी महिनाभरात कार्यान्वित करण्यात याव्यात, असे आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

पाळीव प्राण्यांच्या स्मशानभूमींबरोबरच, महापालिका क्षेत्रातील पाळीव प्राण्यांसाठी फिरता दवाखाना तयार करण्यात येत आहे. टीमटीकडील वापरात नसलेल्या बसगाडीमध्ये आवश्यक बदल करून हा सुसज्ज फिरता दवाखाने सुरू होईल. त्यात, प्रथमोपचार आणि पशूवैद्यक तसेच प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध असेल. त्याचसोबत, पाळीव प्राण्यांसाठी सुसज्ज रुग्णवाहिकाही तयार करण्यात येत आहे. त्याची निविदा प्रक्रिया तातडीने करण्याचे निर्देश आयुक्त राव यांनी दिले.

ठाणे महापालिका क्षेत्रात सुमारे १५ हजार पाळीव प्राणी आहेत. त्यात कुत्रे आणि मांजरी यांची संख्या सर्वाधिक आहे. या स्मशानभूमीसाठी प्रत्येकी सुमारे दीड ते दोन कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. त्यासाठीचा निधी पंधराव्या वित्त आयोगाच्या तरतुदीतून तसेच, राज्याच्या नगरविकास विभागाकडून उपलब्ध झाला आहे.

# वाशिंद पोलीस ठाण्यात सत्यनारायण पुजा संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वाशिंद : वाशिंद पोलीस ठाण्यात साजरा होणा-या गणेश उत्सवा निमित्य सत्यनाराय पुजेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी मोठ्या प्रमाणात आन्न दान करण्यात आले.

गणेश उत्सवाची अनेक वर्षाची परंपरा आजही वाशिंद पोलीस ठाण्यात जोपाण्यात आली आहे. गणेशोत्सव अनंतचतुर्दशी पर्यंत संपन्न होत असतो. गणपती बाप्पाच्या आगमना निमित्य पोलीस ठाण्यात सत्यनारायण पुजेचे आयोजन केले होते . या पुजेसाठी अनेक जातीधर्माचे नागरीक दर्शनासाठी उपस्थीत



होते.या निमित्ताने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. इतरवेळी पोलीस कर्मचारी कर्तव्यावरच असताना आपण पहात असतो मात्र तोच पोलीस कर्यचारी महाप्रसादाच्या वेळी आग्रहाने प्रसाद घेतल्या शिवाय जावू नये असे आग्रह करताना पहावयास मिळाला. स्वता पोलीस निरीक्षण सचिन हुदळेकर हे जातीने उभे राहून महाप्रसादाचा आग्रह करीत होते. या निमित्ताने पोलीस ठाण्यात डोळे तपासणी शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते. याचाही फायदा गणेश भक्तानी घेतला. या कार्यक्रमात मुसलीम समाचाचे नाकरीकही सहभागी झाले होते.

# अतिवृष्टीने बाधित शेतक-यांना तातडीने मदत देणार

## बाधित क्षेत्राचे पंचनामे अंतिम टप्प्यात - कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : गेल्या काही दिवसांपासून राज्यात पुन्हा एकदा मॉन्सून सक्रिय झाल्याने अनेक जिल्ह्यांना पावसाचा फटका बसत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निर्देशानुसार बाधित भागात सुरु केलेले पंचनाम्याचे काम अंतिम टप्यात असून शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्यात येईल. एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही. शेतकरी बांधवांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे आहे, असे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

अतिवृष्टीमुळे राज्यातील २९ जिल्ह्यांतील १९१ तालुक्यांमध्ये मोठे नुकसान झाले आहे. या काळात झालेल्या पावसामुळे ६५४ पेक्षा जास्त महसूल मंडळांमधील खरीप पिकांचे नुकसान झाले आहे. राज्यात १४ लाख ४४ हजार ७४९ हेक्टर क्षेत्र (३६, ११, ८७२.५ एकर)



बाधित झाले आहे. त्यापैकी १० हजार हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र बाधित असलेले १२ जिल्हे आहेत. यामध्ये दि.१५ ते २० ऑगस्ट दरम्यान पडलेल्या सर्वाधिक पावसामुळे शेती पिकांचे जास्त नुकसान झाले आहे.

सर्वाधिक बाधित जिल्हे : नांदेड – ६,२०,५६६ हेक्टर,वाशीम – १,६४,५५७ हेक्टर, यवतमाळ - १,६४,९३२ हेक्टर, धाराशिव - १५०,७५३,बुलढाणा – ८९,७८२ हेक्टर,अकोला - ४३,८२८ हेक्टर,सोलापूर - ४७,२६६ हेक्टर,हिंगोली - ४०,००० हेक्टर क्षेत्रामध्ये बाधित पिके सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर, मूग या पिकांचे सर्वाधिक नुकसान झाले आहे. काही ठिकाणी भाजीपाला, फळपिके, बाजरी, ऊस, कांदा, ज्वारी व हळद या पिकांनाही फटका बसला आहे.एकूण बाधित जिल्हे नांदेड, वाशीम, यवतमाळ, बुलढाणा, अकोला, सोलापूर, हिंगोली, धाराशिव, परभणी,अमरावती, जळगाव, वर्धा, सांगली, अहिल्यानगर, छ. संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धुळे, जळगाव, रत्नागिरी, चंद्रपूर, सातारा, नाशिक, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, गडचिरोली, रायगड व नागपूर.

### महाराष्ट्र जनरल मजदूर संघटनेच्या प्रयत्नातून कामगारांना

# गृहउपयोगी वस्तू भांडी व आरोग्य शिबीर



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली(शरद शहाणे) : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम बांधकाम कल्याणकारी मंडळ आयुक्त कार्यालयातर्फे कामगारांना गृह उपयोगी भांडी वाटप आणि आरोग्य शिबिर असा भरगच्च कार्यक्रम डोंबिवलीतील गांधीनगर येथील स्वर्गीय धर्मवीर आनंद दिघे सभागृहात आयोजित केला होता.

हा कार्यक्रम महाराष्ट्र जनरल मंजूर संघटना, असंघटित नाका कामगारांसाठी लढणारी विश्वसनीय संघटनेचे संस्थापक लक्ष्मण माणिकराव मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती पंढरीनाथ पाटील नगरसेवक उमेश पाटील नगरसेवक राजन मराठे साहेब नगरसेवक विनोद पोखरकर साहेब (मराठा नेते) माणिक उघडे साहेब रिपब्लिकन पार्टी ठाणे प्रदेश उपाध्यक्ष मेघा मोरे ताराराणी ब्रिगेड अध्यक्ष सागर जेधे साहेब शिवसेना युवा डोंबिवली शहर प्रमुख विशाल शेटे साहेब सेफ्टी वेल्फेअर असोसिएशन अध्यक्ष आनंद नवसागरे साहेब रिपब्लिकन जिल्हा अध्यक्ष रवि गायकवाड कार्याध्यक्ष रिपब्लिकन पार्टी समाधान तायडे साहेब रिपब्लिकन नेते सचिन म्हात्रे साहेब उपसरपंच नांदिवली कुमारी. तुलसी सोनी (अँकर) रेखाताई कांबळे समाजसेविका संघटनेचे पदाधिकारी लक्ष्मण मिसाळ संस्थापक अध्यक्ष भीमराव गुंड उपाध्यक्ष नामदेव भानुसे सचिव युवा अध्यक्ष विश्वनाथ रेवगडे खजिनदार गजानन डांगे सहसचिव रामचंद्र वाघ सहखजिनदार चंद्रकांत गायकवाड केंद्रीय कमिटी सदस्य केशव मिसाळ केंद्रीय कमिटी सदस्य कमलाकर पाटील केंद्रीय कमिटी सदस्य सौ वंदना जाधव डोंबिवली शहर अध्यक्ष जयसिंग राजरवाळ नाकाध्यक्ष केशव जहरव नाकाध्यक्ष अंकुश गायकर नाकाध्यक्ष समाधान दास पदाधिकारी काकासाहेब बनसोडे पदाधिकारी असे अनेक मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान या कार्यक्रमात पंढरीनाथ पाटील ,राजन मराठे माजी नगरसेवकांनी कामगारांना मार्गदर्शन केले आणि संघटनेचे अध्यक्ष लक्ष्मण माणिकराव मिसाळ यांच्या कामाचे कौतुक केले. या कार्यक्रमात विशेष आकर्षण म्हणजे नुकत्याच संघर्ष योद्धा जरांगे पाटील यांचे अत्यंत विश्वसनीय , निकटवर्ती, मराठा नेते विनोद पोखरकर यांची उपस्थिती लाभली होती. विनोद पोखरकर यांनी कामगारांना मार्गदर्शन केले आणि लक्ष्मण मिसाळ यांच्या कार्याचा गौरव केला.

विनोद पोखरकर यांच्या हस्ते कामगारांना गृह उपयोगी भांडी वस्तूंचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमात साडेतीनशेहून अधिक कामगारांना या गृह वस्तू चे वाटप आणि आरोग्य शिबिराचा देखील याचा लाभ घेता आला. यावेळी लक्ष्मण पाटील म्हणाले की नजीकच्या काळात कामगारांना सेफ्टी (अत्यावश्यक संच सुरक्षा संच सेफ्टी किट) इक्विपमेंट चे वाटप करण्यात येईल पुढे म्हणाले की आतापर्यंत दहा हजारापेक्षा जास्त कामगारांना अशा वस्तूंचे वाटप करण्यात आले आणि कामगारांच्या मुलांना म्हणजे विद्यार्थ्यांना शाळेसाठी महाविद्यालयासाठी अनुदान देण्यात आले विवाहासाठी अनेकांना 51 हजार रुपये रोख रक्कम देण्यात आली.

# कल्याण मध्ये मिर्गी(एपिलेप्सी) आजारावर मोफत आरोग्य शिबीर

### डॉ. जितेंद्र पाटील यांचे यशस्वी संशोधन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : मिर्गी किंवा फिट येणे (एपिलेप्सी) ही समस्या खूप झपाट्याने वाढत चाललेली आहे. मिर्गी किंवा फिट येण्याआधी व्यक्तीला डोके दुखणे, एकटक बघत राहणे, मिर्गी आल्यानंतर हात पायांना आकडी येणे, हातपाय वाकडे तिकडे होणे ,नजर फिरवणे ,बेशुद्ध होणे ,शुद्धीवर आल्यानंतर कोणत्याही गोष्टीची आठवण न राहणे इत्यादी लक्षणे आढळतात.

कल्याण मधील डॉ. जितेंद्र पाटील (आयुर्वेदाचार्य) यांनी मिर्गी आजारावर २० वर्षापासून अथक संशोधन करून यशस्वी औषधोपचार शोधून काढलेला



आहे. त्यामुळे मिर्गी हा आजार कायमचा ठीक होऊ शकतो आणि मिर्गी रुग्ण सामान्य जीवन जगू शकतात.

जनसामान्यांमध्ये याबाबत जनजागृती व्हावी व मिर्गी रोगमुक्त भारत हे त्यांचे ध्येय आहे. मिर्गी रुग्णांसाठी डॉ. जितेंद्र पाटील मोफत आरोग्य शिबिर आयोजन करत आहेत,त्यामुळे मिर्गी रुग्णांसाठी एक आशेचा किरण आणि नवीन जीवनाची सुखद पर्वणी घेऊन आलेले आहेत.

मिर्गी आजारातून प्रत्येक रुग्ण असह्य त्रासातून कायमचा बरा व्हावा यासाठी ऐतिहासिक कल्याण नगरीमध्ये प्रथमच रविवार दिनांक ७ सप्टेंबर रोजी, सकाळी १० ते ३ वेळात ,डॉ. जितेंद्र पाटील, एपिलेप्सी न्यूरो क्लीनिक, विघ्नहर संकुल, भोईरवाडी बस स्टॉप, कल्याण पश्चिम येथे आयोजित केले आहे. नाव नोंदणी साठी 9372089327 या मोबाईल क्रमांकावर संपर्क करून या आरोग्य शिबिराचा लाभ घेऊ शकता असे आवाहन आयुर्वेदाचार्य डॉ. जितेंद्र पाटील यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# केडीएमसी तर्फे गणेश विसर्जनाची उत्तम व्यवस्था



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे डोंबिवलीतील प्रभाग फ आणि ग मध्ये घरगुती आणि सार्वजनिक गणेश उत्सवाची व्यवस्था उत्तम प्रकारे केली होती ज्यामुळे गणेश मूर्तींचे विसर्जन करताना नागरिकांना मुख्यतः महिलांना आणि लहान मुलांना कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता घेतली होती त्याचप्रमाणे ठेकेदारांना तशा सूचना दिल्या होत्या आणि या सूचनांचे पालन करतात की नाही यासाठी प्रभाग क्षेत्र अधिकारी सहाय्यक आयुक्त हेमा मुंबईकर स्वतः लक्ष ठेवून होत्या घरगुती गणपती विसर्जनासाठी कृत्रिम तलावाची व्यवस्था केली होती त्याचप्रमाणे सार्वजनिक गणपती विसर्जनासाठी सुद्धा कृत्रिम तलावाची उत्तम व्यवस्था केली होती विसर्जन करताना कुठल्याही प्रकारचे अडचण येऊ नये अपघात घडू नये याची दक्षता घेतली होती ठेकेदारांनी सुद्धा उत्तम प्रकारे काम केले होते. ठाकुर्ली चोळेगाव तलाव त्याचप्रमाणे भोईरवाडी तलाव येथे मेसर्स योगेश एम पवार कंपनीचे ठेकेदार राजेश पेटेकर यांनी येथील गणेश विसर्जनाचे काम चोख बजावले

इ प्रभागात मिलाप नगर येथील तलावात गणेश विसर्जनाची व्यवस्था केली होती येथे देखील सार्वजनिक गणेशोत्सवातील छोट्या गणेश मूर्ती आणि घरगुती गणेश मूर्ती चे विसर्जन करण्यासाठी कृत्रिम तलावाची व्यवस्था केली होती येथील प्रभाग क्षेत्र अधिकाऱ्यांनी व्यवस्थेचे निरीक्षण केले आणि समाधान व्यक्त केले येथील मेसर्स श्री गणेश एम के एस एस लिमिटेड कंपनीचे हेमंत पेटेकर यांनी मिलापनगर एमआयडीसी येथील गणेश विसर्जनाचे काम उत्तम रित्या पार पाडले .

फ . प्रभागातील पेंडसे नगर स्वामी विवेकानंद शाळेजवळील गणेश विसर्जनाची व्यवस्था उत्तम रित्या करण्यात आली होती येथे देखील अधिकारी सहाय्यक आयुक्त हेमा मुंबईकर यांनी पाहणी केली आणि समाधान व्यक्त केले.

मेसर्स सुमित बागड कंपनीचे विलास बागड यांनी येथे उत्तम रित्या काम बजावले.

आरटीओ गार्डन. दीडशे फुटी झेंड्या समोरील ठिकाणी गणेश विसर्जनाची व्यवस्था करण्यात आली होती. येथील के एम कंपनीचे ठेकेदार नरेंद्र नारखेडे यांनी उत्तम व्यवस्था केली आणि स्वतः जातीने हजर राहिले आपले कामगार कसे काम करतात याच्यावर सतत लक्ष होतं त्यांचे येथे देखील प्रभाग क्षेत्राधिकाऱ्यांनी पाहणी केली आणि समाधान व्यक्त केले.

दरम्यान फ. प्रभाग क्षेत्र अधिकारी सहाय्यक आयुक्त हेमा मुंबईकर यांनी प्रभागातील काही नागरिकांना प्रश्न विचारले की तुम्हाला या गणेश विसर्जन व्यवस्थेविषयी काय वाटते ? आपल्या काही सूचना आहेत का? विसर्जनच्या व्यवस्थेमध्ये काही कमी वाटते का ?आपण समाधानी आहात का? यावर गणेश विसर्जन करणाऱ्या नागरिकांनी आणि मंडळांनी समाधान व्यक्त केले आणि म्हटले की व्यवस्था उत्तम रित्या केली आहे आम्ही समाधानी आहोत विशेष करून महिलांना आणि लहान मुलांना याचे कुठल्याही प्रकारचा त्रास होत नाही आणि तलावाचे आणि पाण्याचे भय वाटत नाही कारण या सर्वांना पाण्यापासून दूर ठेवले आहेत. रस्ते चांगले करा हे मात्र सांगताना नागरिक विसरले नाही.

# हेटवणे धरणाच्या पाण्यासाठी नागरिकांची अस्तित्वाची लढाई - राजेंद्र झेमसे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : हेटवणे धरण हे पेण तालुक्याच्या जीवनाचा श्वास आहे. या प्रकल्पातून शेतकऱ्यांना दुबार पिकाची संधी, जनतेला पिण्याचे पाणी आणि संपूर्ण तालुक्याला विकासाची नवी दिशा मिळावी या उद्देशाने समाजाची काळजी व दुरदृष्टी असणाऱ्या माजी खासदार स्व. बॅ. ए. टी. पाटील साहेबांच्या अथक प्रयत्नांतून हा, हेटवणे मध्यम सिंचन प्रकल्प उभा राहिला. पण आजच्या परिस्थितीत हा प्रकल्प आपल्या हक्काचे पाणी हिरावून घेणारा ठरत आहे. नवी मुंबईच्या सिडकोकडे या धरणातून पाणी वळवण्याचे काम सुरू असून त्याचा थेट परिणाम पेण तालुक्याच्या अस्तित्वावर होत आहे अशी माहिती वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र झेमसे यांनी दिली.

सध्या सिडकोकडे हेटवणे धरणातून १५० एमएलडी (million litres per day / दशलक्ष लिटर प्रति दिवस) पाणी जात आहे. त्यावर २०२० मध्ये महाराष्ट्र शासनाने आणखी १२० एमएलडी (MLD) चा कोटा मंजूर केला. म्हणजे आता तब्बल २७० एमएलडी, म्हणजेच २७ कोटी लिटर पाणी, दररोज नवी मुंबईला दिले जाणार आहे. वर्षभरात याचे एकूण प्रमाण ९८.५५ एमसीएम (million cubic metres / दशलक्ष घनमीटर) इतके होते. हेटवणे धरणाची उपयुक्त पाणीसाठा क्षमता १४४.९८ एमसीएम (MCM) असल्याने (जलबोगद्याचे काम पुर्ण झाल्यानंतर) त्यातील तब्बल ६८ टक्के पाणी नवी मुंबईकडे वळवले (पळवले) जाणार आहे. याचा परिणाम म्हणून आपल्या भागासाठी उरणार तो केवळ ३२ टक्के पाणी साठा. हा आकडा स्वतःच खरी परिस्थिती सांगून जातो आहे.

शेतकऱ्यांच्या शेतीसाठी राखीव असलेले पाणी, पेणच्या जनतेच्या पिण्याच्या पाण्यासाठी राखीव असलेला पाणीसाठा' हे सारे आकडे कागदोपत्री तर आहेत, पण प्रत्यक्षात शेतकरी उन्हाळ्यात पाण्याअभावी पिके घेऊ शकत नाही. धरणात वर्षाअखेरीस उरतो फक्त ४६.४३ एमसीएम (MCM) पाणी. एवढा साठा संपूर्ण तालुक्याला पुरणार कसा? उलट नवी मुंबई रोज कोट्यवधी लिटर पाणी पुरवठा करून आपले विकासाचे स्वप्न रंगवत आहे. हा अन्याय पाहून संपूर्ण तालुका आज संतप्त आहे असेही राजेंद्र झेमसे यांनी सांगितले.

यामागे जबाबदार कोण? तर आपल्या निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींचीच भूमिका यात सर्वात जास्त प्रश्नांकित आहे. त्यांनी जनतेचा हक्क व शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाण्यासाठी आवाज उठवला नाही. उलट सिडकोच्या दबावाखाली किंवा स्वार्थासाठी मौन बाळगले. सध्या हेटवणेचे पाणी नवी मुंबईकडे नेण्यासाठी १०० मीटर खोल जलबोगदा खोदून पाणी वळवण्याचे काम सुरू आहे, तेही जलसंपदा विभागाची परवानगी न घेता. हे काम सर्वांच्या नजरेसमोर सुरू असतानाही, स्थानिक वृत्तपत्रांतून वारंवार बातम्या येत असतानाही आपले एकही लोकप्रतिनिधी एक शब्दही बोलत नाहीत. जनेतेच्या दृष्टीने ही वागणूक विश्वासघातकी नाही तर काय?अशी शंकाही व्यक्त केली.यामागे आणखी मोठा प्रश्न दडलेला आहे. जलबोगद्याच्या पाईपाचा व्यास नेमका किती आहे? तो खरोखर उर्वरित १२० एमएलडी (MLD) एवढे पाणी वाहून नेण्याच्या क्षमतेपुरता आहे, की त्यापेक्षा अधिक आहे? जर व्यास जास्त असेल, तर उरलेले ३२ टक्के पाणीही भविष्यात सिडको पळवण्याच्या तयारीत आहे काय? मग पेण तालुक्यासाठी एक थेंबही पाणी उरणार नाही. हा संशय निराधार नाही' कारण आजवर घेतलेल्या निर्णयांतून सत्ताधारी व लोकप्रतिनिधींचा सिडकोकडे झुकलेला कल दिसून येतो की काय अशी शंका व्यक्त केली.

पेण तालुक्याच्या शेतकऱ्यांच्या जमिनींवर सातबारा उताऱ्यावर 'हेटवणे मध्यम सिंचन प्रकल्पासाठी आरक्षीत' असे शिक्के मारलेले आहेत. पण त्या जमिनींसाठी ठरवलेले हक्काचे पाणी शेतकऱ्यांना आजवर मिळाले काय? जनतेसाठी राखून ठेवलेले पाणी प्रत्यक्षात पिण्यासाठी उपलब्ध झाले काय? हे आकडे शासनाने पारदर्शकपणे जाहीर केलेले नाहीत. त्यामुळे जनतेच्या मनात संशय अधिक गडद होत आहे. एवढेच नव्हे तर आतापर्यंत लुटलेले पाणी' त्याची भरपाई कोण करणार? शासन की सिडको? आणि भरपाईची पद्धत काय? हे प्रश्न कायम अनुत्तरीत आहेत.

लोकप्रतिनिधींनी सत्तेच्या खुर्च्या मिळवण्यासाठी आपल्या जनतेच्या भवितव्याशी तडजोड केली आहे. या निष्क्रिय भूमिकेमुळे आज जनतेचा भ्रमनिरास झाला आहे. पण आपण हे वास्तव स्वीकारले, तर भविष्यात आपली शेती राहणार नाही, आपली भावी पिढी पाण्याविना जगण्यास भाग पडणार आहे. म्हणूनच आजच आपण सर्वांनी मिळून जबाबदारी उचलली पाहिजे. असेही सांगितले

अतिरिक्त कोटा रद्द झाला पाहिजे

आजची मागणी एकच असायला हवी' सिडकोला दिलेला १२० एमएलडी (MLD) चा अतिरिक्त कोटा तात्काळ रद्द करावा. शासनाने मंजूर केलेले ७६६ कोटी रुपयांचे काम तातडीने सुरू करून पेण तालुक्यातील शेतकऱ्यांना दुबार पिकासाठी पाणी द्यावे. अन्यथा जनता मोठे व निर्णायक आंदोलन उभे करेल. हे आंदोलन केवळ शेतीसाठी नाही, तर पेण तालुक्याच्या पिण्याच्या पाण्यासाठी आणि अस्तित्वासाठीही असणार आहे.

समाजबांधवांना आवाहन

आज आपण गप्प बसलो, तर उद्या आपली भावी पिढी आपल्याला कधीही माफ करणार नाही. आपल्या हक्काच्या पाण्यासाठी लढा देणे ही केवळ शेतकऱ्यांची जबाबदारी नाही, तर संपूर्ण तालुक्याची आहे. म्हणून चला, एकजुटीने उभे राहूया. आपला आवाज बुलंद करूया. आणि आपल्या हक्काचे पाणी वाचवण्यासाठी ठाम लढा देऊया असे आवाहन वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र झेमसे यांनी केले आहे.



# रबाळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात जप्त वाहनांचा लिलाव

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : नवी मुंबई येथील रबाळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात विविध गुन्हयात जप्त असलेल्या वाहनांचा लिलाव दिनांक 05 सप्टेंबर 2025 रोजी रबाळे एमआयडीसी पोलीस ठाणे आवारात करण्यात येणार असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरिक्षक सुनिल वाघमारे यांनी दिली.

रबाळे एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत विविध गुन्हयात प्राप्त झालेली 17 वाहनांपैकी 12 मोटार सायकाल व 05 थ्री व्हीलर रिक्षा बेवारस वाहने रबाळे एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या आवारात ठेवण्यात आली आहेत. मा. सत्र न्यायलयाच्या परवानगीने दि.05 सप्टेंबर 2025 रोजी या वाहनांचा लिलाव करण्यात येणार आहे. जाहिर लिलावातील वाहने घेण्यास इच्छुक असलेल्या नागरिकांनी या वाहनांबाबत अधिक माहितीसाठी रबाळे एमआयडीसी पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा. लिलावात जास्तीत जास्त स्क्रॅप खरेदी विक्री करणाऱ्या व्यवसायिकांनी तसेच नागरिकांनी मोठया संख्येने सहभाग घ्यावा, असे आवाहन रबाळे एमआयडीसी पोलीस ठाणे नवी मुंबईचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल वाघमारे यांनी एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## केडीएमसीच्या स्वच्छता जनजागृतीस नागरिकांचा प्रतिसाद



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : सध्या सुरू असलेल्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कल्याण डोंबिवली महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभाग आणि सुमित एल्कोप्लास्ट संस्थेच्या आय.ई.सी टीमतर्फे शहरात ठिकठिकाणी स्वच्छतेबाबत जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे.

या मोहिमेअंतर्गत आय.ई.सी टीमने कल्याण डोंबिवलीतील विविध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना भेटी देत नागरिकांशी थेट संवाद साधला. यात गणेशोत्सव काळात निर्माण होणारे निर्माल्य आणि त्याची विल्हेवाट, परिसराची स्वच्छता राखण्याचे महत्त्व, ओला - सुका कचरा यांचे स्वतंत्र वर्गीकरण, वैद्यकीय कचऱ्याची योग्य विल्हेवाट तसेच स्वच्छतेबाबत प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आणि कर्तव्ये याबाबत पथनाट्याद्वारे मार्गदर्शन करण्यात येत आहे.

या उपक्रमाला गणेशोत्सव मंडळांच्या कार्यकर्त्यांसह स्थानिक नागरिकांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. असे उपक्रम राबविल्यामुळे आम्हाला प्रत्यक्ष मार्गदर्शन मिळते आणि कचऱ्याचे योग्य नियोजन करणे सोपे जाते. स्वच्छता ही केवळ महानगरपालिकेची जबाबदारी नसून शहरातील प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याची जाणीव लोकांमध्ये निर्माण होत असल्याची प्रतिक्रिया जागरूक नागरिकांकडून देण्यात आली.

मुले, युवक आणि महिलांचा या जनजागृती मोहिमेत विशेष सहभाग दिसून आला. लहान मुलांनी मंडळाच्या परिसरात स्वच्छता ठेवण्याची शपथ घेतली, तर काही महिलांनी ओला आणि सुका कचरा वेगळा करण्यासाठी घरीच स्वतंत्र डबे ठेवण्यास सुरुवात केली आहे.

या उपक्रमामुळे शहराच्या स्वच्छतेत निश्चितच सुधारणा होईल, तसेच नागरिकांच्या विचारसरणीत सकारात्मक बदल घडून येईल, असा विश्वास महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून व्यक्त करण्यात आला आहे.

गणेशोत्सव हा धार्मिक उत्सव असला तरी त्यातून समाजहिताचे, पर्यावरणपूरक उपक्रम राबवले गेले तर त्याचे दीर्घकालीन,चांगले परिणाम शहराच्या विकासावर होणार आहेत.

## टी ई टी च्या विरोधात शिक्षक परिषदेचा राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : इयत्ता पहिली ते आठवीच्या वर्गांना शिकविणारा कोणताही शिक्षक टी. ई. टी. उत्तीर्ण झाल्याशिवाय सेवेत राहू शकत नाही किंवा पदोन्नतीही मिळवू शकत नाही असा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. बालशिक्षण हक्क कायदा 2009 पूर्वी नियुक्त झालेले शिक्षक आणि पाच वर्षापेक्षा कमी सेवा शिल्लक असलेल्या शिक्षकांना टी ई टी तून वगळलेले आहे मात्र हजारो शिक्षकांना दोन वर्षात टी ई टी उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे अन्यथा सदर शिक्षकांना सेवा निवृत्ती स्वीकारावी लागेल असे न्यायालयाने स्पष्ट केलेले आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे शिक्षकांना मोठा धक्का बसला आहे. महाराष्ट्र शासनाने 13 फेब्रुवारी 2013 च्या शासन निर्णयानंतर नियुक्त शिक्षकांना टी ई टी बंधनकारक केलेली आहे. यापूर्वी नियुक्त शिक्षकांना टी ई टी बंधनकारक नव्हती. महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्य अध्यक्ष वेणूनाथ कडू यांच्या अध्यक्षतेखाली राज्य पदाधिकाऱ्यांची तातडीने ऑनलाईन सभा घेतली सदर सभेत माजी शिक्षक आमदार ना.गो. गाणार यांनी सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल व राज्य अध्यक्ष वेणूनाथ कडू यांनी संघटनेची पुढील रणणिती याच्यावर मार्गदर्शन केले. न्यायालयाच्या निकालामुळे शिक्षकांवर खूप मोठा अन्याय होणार असून अन्याय दूर करण्याकरिता कायदे तज्ञांमार्फत लवकरच मार्गदर्शन घेऊन राज्य शासन व केंद्र शासनास योग्य मार्ग काढण्याकरिता निवेदन दिले जाईल. तसेच महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद राज्य व्यापी आंदोलन करण्याच्या तयारीत असल्याचे कोकण विभागाचे अध्यक्ष गुलाबराव पाटील यांनी सांगितले.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११२४) कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# मुसळधार पावसामुळे भिवंडीतील गणेशोत्सव मंडळ धास्तावले

## जनजीवन झाले विस्कळीत



**मुंबई नाशिक भिवंडी ठाणे बायपास व भिवंडी वाडा, जुना आग्रारोड महामार्गावरील खराब व खड्डेमय सखल भागातील रस्त्यावर काही प्रमाणात पाणी साचल्याने वाहतूक व्यवस्था अत्यंत धिम्या गतीने सुरू होती.त्यामुळे जागोजागी वाहतूक कोंडी झाली होती.**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : गेल्या दोन दिवसापासून पडत असलेल्या कधी रिमझिम तर काही वेळ मुसळधार पावसामुळे भिवंडी शहर व ग्रामीण भागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे असुन गणेशोत्सव धुमशान सुरू असतानाच पडत असलेल्या पावसामुळे गणेशोत्सव मंडळ धास्तावली आहेत, मंडपात पावसाचे पाणी शिरू नये यासाठी प्लास्टिक तालपत्री लाऊन विशेष सुरक्षाव्यवस्था केली जात आहे. महापालिका प्रशासनाकडून नालेसफाई व गटार सफाई योग्य पद्धतीने न झाल्यामुळे मुख्य रस्ते आणि भिवंडी शहरातील विविध सखल भागातील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते, पाण्याचा निचरा न झाल्याने रस्त्यावर पाणी तुंबल्याने खड्डेमय रस्त्यावर तलावाचे स्वरूप निर्माण झाले आहे.त्यामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाली होती.शनिवार 6 सप्टेंबर रोजी गणेश विसर्जन सोहळा असल्याने मंडळाच्या वतीने मिरवणूक तयारी सुरू झाली आहे मात्र शहरातील विविध भागातील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे असल्याने गणेश मंडळ व नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

महापालिका प्रशासनाने खराब रस्ते व खड्डे दुरूस्त न केल्याने गणेशोत्सव मंडळासमोर मोठा प्रश्न निर्माण झाला.

गुरुवारी सायंकाळ व सकाळपासून पावसाने भिवंडीत जोरदार हजेरी लावली लावल्याने गणेशोत्सव मंडळ सावध झाली होती. आरास व सजावट करून उभारण्यात आलेल्या गणेश मंडपात पावसाचे पाणी शिरू नये यासाठी विशेष काळजी घेतली जात आहे. रात्रीमहिला व पुरूष वर्ग कुटुंबातील सदस्यांसह गणेश दर्शन देखावे पाहण्यासाठी आलेल्या गणेश भक्तांचे पावसामुळे अतोनात हाल झाले.उद्या शनिवार गणेश विसर्जन सोहळा असल्याने महिला व नागरिकांनी बाजारात जीवनावश्यक वस्तू सामान खरेदी करण्यासाठी गर्दी केली होती. मात्र सतत कोसळत असलेल्या पावसामुळे त्यांचे हाल झाले.

# शिवनेरी विद्यालयात विद्यार्थी बनले शिक्षक

## गुरुजनांना दिला अनोखा सन्मान



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ओतूर : शिवनेरी विद्यालय धोलवड येथे डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीचे औचित्य साधून शिक्षक दिन साजरा करण्यात आल्याची माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापक समीर वामन यांनी दिली.

या दिवसाचे औचित्य साधून ग्रामपंचायत धोलवड आणि समस्त ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यालयातील माजी मुख्याध्यापक सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचा उपस्थित सन्मान चिन्ह देऊन यथोचित सत्कार करण्यात आले. या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन आणि डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन व विद्येची देवता माता सरस्वतीच्या प्रतिमा पूजनाने झाली.

शिक्षक दिनाच्या निमित्ताने इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी दिवसभर शिक्षकाची भूमिका निभावत वेगवेगळया विषयांचे तास विविध वर्गांवर घेतले आणि शेवटी कार्यक्रमांमध्ये आपल्या अनुभवांचे बोल आपल्या मनोगताद्वारे विद्यार्थ्यांनी मांडले.

माजी मुख्याध्यापक व्हि. जे.कातोरे जी. वाय.फटांगरे, ग्रामशिक्षण मंडळाचे अध्यक्ष भालचंद्र नलावडे, सरपंच वैभव नलावडे, धोलवड ग्रामविकास ट्रस्टचे अध्यक्ष कुलदीप नलावडे, मुख्याध्यापक समीर वामन यांनी आपली मनोगते व्यक्त करताना समाजामध्ये शिक्षकाची भूमिका, शिक्षकांचे समाजातील स्थान,बदलत जाणारी परिस्थिती, समाजाच्या अपेक्षा, विद्यार्थ्यांची मानसिकता,आणि स्पर्धा परीक्षांचा काळ, समोर असणारी विविध आव्हाने, या विषयी आपल्या भूमिका आपल्या मनोगतातून मांडल्या.

या कार्यक्रमावेळी बीनाई सामाजिक संस्थेचे अध्यक्ष नितीन शेलार, तुकाराम गीते, शिवाजी पाटील, ज्योति शेलार यांच्या माध्यमातून विद्यालयातील दोन गरजू विद्यार्थिनींना सायकलचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमवेळी व्हि. जे.कातोरे, जी.वाय. फटांगरे, समीर वामन, जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष गुलाब पा. नलावडे, पतसंस्थेचे चेअरमन प्रदीप मुंडे, पोर्णिमा भोर, सतीश नलावडे,अरुण नलावडे, विनायक नलावडे, दत्तात्रय नलावडे, शरद नलावडे,निवृत्ती मुंडे, ज्योति शेलार, तुकाराम गीते, शिवाजी पाटील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपशिक्षक गोसावी आर.एस, वेडे बी.एच, शिवशरण एस.व्ही, जाधव एस. वाय, कानडे एस.पी, पानसरे एस. व्ही, करपे एस. के, मयुरी तांबे यांनी विशेष प्रयत्न केले. सूत्रसंचालन तन्मय भोर, सुयश ताजणे यांनी केले तर आभार संस्कृती घोलप हिने मानले.

# पाटणोली येथून ११ वर्षीय मुलाला फुस लावून पळवल्याची धक्कादायक घटना



संस्कार रामकेवल चौधरी, वय- ११ वर्ष ०२ महिने हा दि. ०२/०९/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता त्याचे आईकडून पैसे घेवुन दुकानात जावून येतो असे सांगुन घरातुन निघून गेला. परंतु तो घरी परत न आल्याने फिर्यादी व त्यांचे पत्नी यांनी त्यांचे मुलाचा भरपुर शोध घेवून, शेजारी पाजारी यांचेकडे विचारपुस करुन, पेण शहरात व त्यांचे मुलाचे शाळेतील सर्व मित्रांकडे भरपुर शोध घेवून देखील फिर्यादी यांना त्यांचा मुलगा मिळून न आल्याने त्यास कुणीतरी अज्ञात इसमाने काहीतरी फुस लावुन पळवून नेले असावे म्हणून त्याबाबत पेण पोलीस ठाणेस तक्रार दिल्यावरुन सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण पोलीस ठाणे अभिलेखावर गु.र.नं. १२७/२०२५ भारतीय न्याय संहीता-२०२३ चे कलम १३७ (२) प्रमाणे दि. ०३/०९/२०२५ रोजी २०.३८ वाजता गुन्हा नोंद असून सदर गुन्हयाचा तपास पोलीस करीत आहोत.

सदर गुन्हयातील फिर्यादी रामकेवल रामप्रकाश चौधरी, वय-३८ वर्षे, व्यवसाय गवंडीकाम, मुळ रा. पेंडारी बुजुर्ग, ता. बन्सी, जि. सिध्दार्थनगर (उत्तर प्रदेश राज्य), सध्या रा. गिता हरीराम भानुशाली यांचे घरात, मुरलीधरनगर, पाटनोली, ता. पेण, जि. रायगड यांचा मुलगा कु.

**सदर गुन्हयातील अपहृत मुलाचे वर्णन खालील प्रमाणे :-**

कु. संस्कार रामकेवल चौधरी, वय ११ वर्षे ०२ महिने (जन्म तारीख १९/०६/२०१४), रा. गिता हरीराम भानुशाली यांचे घरात, मुरलीधरनगर, पाटनोली, ता. पेण, जि. रायगड, बांधा- मध्यम, रंग- गोरा, उंची ३ फुट ०४ इंच, केस काळे, चेहरा गोल, डोळे काळे, अंगात- पिवळया रंगाचा टी शर्ट व निळया रंगाची हाफ पॅन्ट, पायात हिरवे रंगाची चप्पल, बोलीभाषा हिंदी अशी आहे.तरी सदर गुन्हयातील अपहृत मुलाचा शोध होणे अधिक तपास पेण पोलिस निरीक्षक संदीप बागुल उपनिरीक्षक नवनाथ रसाळ हे करत आहेत

# तांबा पितळेची भांडी बापरुन सजवले बाप्पाचे मखर अडगळीत पडलेल्या भांड्यांचा उपयोग

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वाशिंद : संसारातील तांबा - पितळेची भांडी संसारातून लुप्त होत चालली असलीतरी बदलापूर येथील स्टार मंडळाने हीच भांडी वापरून गणपती बांप्पाचा मखर सजविल्याने या मंडळाचा सर्वत्र कौतूक होत आहे.

अनेक ठिकाणी गणेश उत्सवात महाकडी मखर आपणास वाहावयास मिळत आहेत. पर्यावरणाची काळजी घेत अनेक ठिकाणी तयार केलेली मखर पहावयास मिळत आहेत. तर काही ठिकाणी विद्यूत रोषणाई वापरून मखर केलेले दिसून येत आहेत. मात्र



बदलापूर येथील वाणी आळीतील स्टार मंडळाने घरात अडगळीत पडलेली तांबा पितळची भांडी वापरून लुप्त होत चाललेली ही भांडी मखराच्या सजावटीच्या माध्यमातून गणेश भक्तांच्या नजरेत आणून दिल्याने व जुने ते सोने याची जाणीव करून दिल्याने त्यांचे कौतूक होत आहे.

# अमृत आणि एम.सी.ई.डी.मार्फत मोफत प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रभोधिनी (अमृत), पुणे आणि उद्योग संचालनालय महाराष्ट्र शासन अंतर्गत कार्यरत महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (M.C.E.D) अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने अमृत लक्षित गटातील (ब्राह्मण, बनिया, राजपुरोहित, कायस्थ, एयंगार, पाटिदार, बंगाली, पटेल, मारवाडी, गुजराती, सिंधी, राजपुत, कोमटी, जाट, कानबी) आदि उमेदवारांसाठी विविध निःशुल्क प्रशिक्षण कार्यक्रमाचे जिल्ह्यात विविध ठिकाणी आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा व्यवस्थापक, रायगड-अलिबाग महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधनी, (अमृत) शैलेश विनायक मराठे यांनी दिली आहे.लक्षित गटातील युवक आणि युवतींसाठी अमृत-सुर्यमित्र (सौर), अमृत-आयात निर्यात आणि अमृत-निवास उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (EDP 21 दिवस), अमृत तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (TEDP- 30 दिवस) आणि अमृत क्षमता बांधणी प्रशिक्षण कार्यक्रम (06 दिवस) हे तीन प्रकारचे प्रशिक्षण अनिवासी स्वरूपात होणार आहे.

सदरील जे तांत्रिक प्रशिक्षण आहेत त्या संबंधित ट्रेडचे संपूर्ण प्रात्यक्षिक होणार असून सर्व ट्रेनिंगमध्ये जे तांत्रिक प्रशिक्षण आहेत तसेच उद्योजकीय मार्गदर्शन, व्यवसाय सुरू करण्यासाठी आर्थिक, व्यवस्थापकीय आणि कायदेशीर माहिती, मार्केटिंग कौशल्य ग्राहकांशी संबंध तयार करून बाजारात व्यवसाय वाढविण्याचे तंत्र, शासनाच्या विविध योजना, बँकिंग प्रकल्प अहवाल, उद्योगात लागणारे कागदपत्रे, उद्योजकीय मानसिकता, उद्योजकीय गुणसंपदा इ. विषयांवर तज्ञामार्फत मार्गदर्शन होणार आहे. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर व्यवसाय उभारण्यासाठी एम.सी.ई.डी. मार्फत पाठपुरावा केला जाणार असून प्रशिक्षणानंतर मोफत मार्गदर्शन मिळणार आहे.

अमृत लक्षित गटातील किमान 8 वी पास, कोणत्याही शासकीय कागदपत्रावर जातीचा उल्लेख, तहसीलदार याचे रहिवासी दाखला आणि उत्पन्नाचा दाखला इ. असणारे अमृत लक्षित गटातील इच्छुक उमेदवार यासाठी अर्ज करू शकतात. यासाठी अमृत रायगड जिल्हा कार्यालय अलिबाग, उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) कार्यालयाच्या बाजूला, अलिबाग, रायगड येथे निवड प्रक्रिया सुरू आहे.अमृत लक्षित गटातील लाभार्थींची मुलाखतीव्दारे निवड होणार असून इच्छुकांनी आनंद विद्यागर एम.सी.ई.डी. प्रकल्प अधिकारी, रायगड मो.९४०३०७८७७२ किंवा शैलेश विनायक मराठे, जिल्हा व्यवस्थापक अमृत, अलिबाग रायगड मो. ९११२२२८७५९ यांच्याशी संपर्क साधून या निःशुल्क प्रशिक्षण कार्यक्रमाचा जास्तीत जास्त युवक, युवती आणि उद्योजक तथा नवउद्योजक यांनी लाभ घ्यावा असे आवाहन दत्तात्रेय थारवे, विभागीय अधिकारी, कोकण विभाग (कोकण भवन) व श्रीकांत कुलकर्णी, राज्य समन्वयक एम. सी. ई. डी. यांनी केले आहे.

# ईद-ए-मिलाद निमित्त वाड्यात उत्साही जुलूस



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वाडा : ईद-ए-मिलाद (मिलाद उन-नबी) निमित्त वाडा शहरात शुक्रवारी मोठ्या उत्साहात जुलूस काढण्यात आला. या जुलूसात मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. हातात झेंडे घेऊन मुलांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी मो.पैगंबरांच्या जयंती निमित्त नारे देत उत्साह व्यक्त केला. विशेष सजवलेले वाहन, झेंड्यांची उभारणी आणि पारंपरिक पोशाखात सजलेले लहानगे यामुळे वातावरणात धार्मिक उत्साह अधिकच वाढला. वाडा शहरातील मशीद नाका येथून मुख्य बाजारपेठ, बस स्थानक, खंडेश्वरी नाका व परत मुख्य बाजारपेठेतून परळी नाका येथे असलेल्या दरगाह पर्यंत जुलूस काढण्यात आला. वाडा पोलीस प्रशासनानेही चोख बंदोबस्त ठेवत वाहतूक सुरळीत ठेवली. वाडा शहरातील परळी नाका येथील दरगाह मध्ये मुस्लिम बांधवानी अभिवान करून जुलूसची सांगता केली. यावेळी वाडा पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक दत्तात्रय किंद्रे, पोलीस उपनिरीक्षक सुमेध मेढे व पोलीस उपनिरीक्षक हरि धांगडा उपस्थित होते.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024